22 August Page 6 Epaper
22 Aug 2025

सांज दैनिक
सारथी समाचार

# विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन

## श्री कुमारस्वामी महाविद्यालयात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' जनजागृती

**लातूर/प्रतिनिधी:** तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे इंटरनेट आज प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. मोबाईल, संगणक, ई-मेल्स आणि सोशल मीडिया या साधनांमुळे संवाद, शिक्षण आणि व्यवहार अधिक वेगवान व सोपे झाले आहेत. मात्र, या सुविधांबरोबरच सायबर गुन्ह्यांचा धोका देखील मोठ्या प्रमाणात वाढत असून विद्यार्थ्यांपासून ते प्रौढांपर्यंत सर्वांना त्याचा फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना डिजिटल जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी आणि त्यांच्यात सुरक्षित इंटरनेट वापराची सवय निर्माण करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' या जनजागृती उपक्रमांतर्गत श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत विविध उदाहरणे, किस्से व प्रत्यक्ष जीवनातील अनुभवांच्या आधारे मार्गदर्शन केले.



त्यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर कसा करावा, अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या लिंक्स किंवा मेसेजेसवर विश्वास न ठेवता फिशिंग हल्ले कसे ओळखावेत, याबाबत सोप्या भाषेत समजावून सांगितले. तसेच, मजबूत व सुरक्षित पासवर्ड तयार करण्यासाठी मोठी व लहान अक्षरे, अंक आणि विशेष चिन्हांचा वापर कसा आवश्यक आहे, हेही स्पष्ट केले. ऑनलाइन बँकिंग व डिजिटल पेमेंट करताना सावधगिरी बाळगण्याचे मार्ग, ओटीपी किंवा संवेदनशील माहिती इतरांशी कधीही शेअर न करण्याचे महत्त्व, तसेच इंटरनेटवर होणाऱ्या विविध फसवणूक प्रकारांची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.

विद्यार्थ्यांच्या शंका निरसनाच्या माध्यमातून त्यांनी दैनंदिन जीवनात येणाऱ्या सामान्य समस्यांवरही चर्चा केली. उदाहरणार्थ, गेमिंग ॲप्स मधून होणारे आर्थिक नुकसान, नकली ई-मेल्समुळे होणारी माहितीची गळती, तसेच सोशल नेटवर्क्सवर आपली वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे उपाय यावर विद्यार्थ्यांना स्पष्ट मार्गदर्शन मिळाले.

याशिवाय, कार्यशाळेत सायबर गुन्हा घडल्यास त्यावर योग्य प्रतिसाद देणे का महत्त्वाचे आहे, हेही ठळकपणे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता तात्काळ तक्रार नोंदवावी आणि यासाठी सरकारने उपलब्ध करून दिलेल्या हेल्पलाईन क्रमांक १९३० चा वापर कसा करावा, तसेच ऑनलाइन सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार कशी नोंदवायची, याची माहितीही देण्यात आली.

कार्यशाळेला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुसुम ढोणे आणि प्राध्यापक वर्गामध्ये डॉ. प्रसाद कदम, डॉ. सुभाष इंदलकर, प्रा. रवि जाधव, प्रा. मधुकर कदम, प्रा. शिवराज मिटकरी यांची उपस्थिती होती. कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंटरनेटचा वापर अधिक विचारपूर्वक व सुरक्षितरीत्या करण्याची सवय निर्माण होईल. सायबर गुन्ह्यांचा धोका लक्षात घेता त्यांनी सजगतेने इंटरनेटचा वापर करावा, हीच खरी या कार्यशाळेची यशस्वीता ठरेल. अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांमुळे समाजात सुरक्षित, जबाबदार व तांत्रिक दृष्ट्या सशक्त पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल.